महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५६ वा | दिनांक : ०८/०८/२०२५ | वार : शुक्रवार

## प्रांजल खेवलकरांच्या मोबाइलमध्ये १७७९ अश्लील फोटो अन् व्हिडिओ



**पुणे** : पुण्यात काही दिवसांपूर्वी कथित रेव्ह पार्टीवर धाड टाकत पोलिसांनी कारवाई केली होती. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली. तसेच या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज पत्रकार परिषद घेत मोठा गौप्यस्फोट केला आहे. मानवी तस्करी झाल्याचा गंभीर आरोप चाकणकर यांनी केला आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या, प्रांजल खेवलकर यांच्या इंद्रप्रस्थ सोसायटी येथील घरातून जो मोबाइल जप्त केला होता त्यात सायबर तज्ज्ञांच्या यांच्या माहितीने विश्लेषण करून तपासणी केली असता या मोबाइलमधील हिडन फोल्डरमध्ये महिलांसोबत असलेले चॅटचे स्क्रीनशॉट, पार्टीचे फोटो, व्हिडिओ, महिलांचे नग्न व अर्धनग्न फोटो व काही अशोभनीय कृत्यांचे व्हिडिओ हाती लागले. या मोबाइलमध्ये जे व्हॉट्सअप चॅट समोर आले त्यात एकूण ७ मुली आढळून आल्या. या सातही मुलींची नावे आरुष नावाने सेव्ह केली होती. म्हणजेच आरुष या नावाची व्यक्ती मुलींचे ह्युमन ट्रॅफिकिंग करत होते. या चॅटवरून असे लक्षात येते की आरुष या नावाच्या व्यक्तीने मुलींना लोणावळा आणि पुणे या ठिकाणी पार्टीसाठी बोलावले होते.

पुढे बोलताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, पोलिसांनी छापा टाकल्या त्याच्या दोन दिवस आधी म्हणजे २५/०६/२०२५ रोजी त्याच ठिकाणच्या हॉटेलमध्ये रात्री १० ते पहाटे ४ पर्यंत दारू व हुक्का पार्टी सुरू होती. त्यावेळेस देखील काही मुली बोलावल्या होत्या. यामध्ये प्रांजल खेवलकर यांच्या चॅटचे अवलोकन केले असता यामध्ये महिलांसोबत आपत्तीजनक चॅट असून मुलींसोबत सिनेमामध्ये शूटिंग संदर्भात संपर्क साधण्यात आला आहे. या मुलींना सिनेमामध्ये काम देतो असे सांगून बोलावल्याचे तसेच त्यांचा वापर केल्यानंतर त्यांच्या खर्चाचे सुद्धा पैसे दिले नसल्याने मुलींनी वारंवार पैशांची मागणी केल्याचे यामधून दिसून येत आहे.

प्रांजल खेवलकर यांनी खराडीमधील हॉटेल असेल गोवा येथील हॉटेल असेल लोणावळा, साकीनाका आणि जळगाव या ठिकाणी मुलींना बोलावून अशा प्रकारच्या पार्ट्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. या हिडन फोल्डरमध्ये महिलांचे मुलींचे अश्लील व्हिडिओ, या मुलींसोबत लैंगिक अत्याचार झाल्याचे दिसून येते. काही मध्यस्थांच्या मार्फत खेवलकर यांनी पार्टीसाठी मुली पाठवल्याचे सुद्धा या चॅटमधून समोर आले आहे. तसेच या प्रकरणी मोठ्या प्रमाणात ह्युमन ट्रॅफिकिंगची शक्यता नाकारता येत नाही. प्रांजल खेवलकर आणि त्याचे सहकारी तसेच या पार्टीमध्ये असलेल्या मुली या दोन वर्षांपासून संपर्कात असल्याचे दिसते. तसेच या पार्टीमध्ये अमली पदार्थ गांजा घेऊन येण्याची पूर्वकल्पना होती. त्यानुसार ही चॅट झाली असल्याचा दावा रूपाली चाकणकर यांनी केला आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या, या मोबाइल मधल्या हिडन फोल्डरमध्ये २५२ व्हिडिओ सापडले, त्यात १४९७ फोटो असे एकूण १७७९ फोटो व व्हिडिओ आहेत. या व्हिडिओमध्ये मुलींसोबत अश्लील व अश्लाघ्य कृत्य केल्याचे व्हिडिओ व फोटो आहेत. मुलींना विवस्त्र करत नशा करून लैंगिक अत्याचार करून व्हिडिओ करण्यात आले व त्यांना ब्लॅकमेल करण्यात आले आहे. घरात मोलकरणीचे काम करणाऱ्या महिलेचे सुद्धा अश्लील व्हिडिओ व फोटो असल्याचे समोर आले आहे. या सगळ्या मुलींना पटवण्यासाठी आरुष नावाचा व्यक्ती ठेवला होता.

एकंदरच हे सगळे प्रकरण पाहता राज्य महिला आयोगाच्या वतीने काही दिवसांपूर्वी पुणे पोलिसांना काही सूचना केल्या होत्या. त्यानुसार तपास करण्यात आला आहे. अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट हे यामध्ये काम करत आहे. त्यानिमित्ताने हे सगळे प्रकरण पाहिले तर मानवी तस्करी यात झाली आहे. या मुलींचे परराज्यात व्यापार करून लैंगिक अत्याचार करण्यात आला असल्याचा गंभीर आरोप रूपाली चाकणकर यांनी केला आहे.

रूपाली चाकणकर यांच्या पत्रकार परिषदेवर प्रत्युत्तर देताना एकनाथ खडसे म्हणाले, मला असे वाटते की चाकणकर या चेकाळल्या आहेत. हे सगळे आरोप करत असताना जर पुरावे असतील तर पुरावे दाखवा. हा जो गुन्हा दाखल करण्यात आला आहे तो नारकोटिक्सच्या संदर्भात आहे. नारकोटिक्समध्ये काही सापडले की नाही, त्याने काही सेवन केले की नाही, हे सगळे कोर्ट ठरवेल दोषी आहे की नाही. गुन्हा दाखल वेगळा आहे आणि आता हे महिलांच्या तस्करीवर बोलत आहेत. चाकणकर अशा आविर्भावात बोलत आहेत की तपासाच्या त्याच अधिकारी आहेत. बदनामीचे षड्यंत्र थांबवा. त्यांच्या संदर्भात देखील अनेक गोष्टी ऐकिवात आहेत, पण मी या गोष्टीत पडत नाही. एखाद्या गुन्ह्याचे समर्थन करणारा मी नाही. माझा जावई असेल तरी पुरावे सापडले तर फाशी लावा, पण पुराव्याशिवाय बोलू नका. राज्य महिला आयोगाकडे तक्रार आलेली नसताना बदनामी करण्याचे काम सुरू आहे.

## शिवसेनेच्या मंत्र्यांना इनकम टॅक्सची नोटीस - रोहित पवार



**छत्रपती संभाजीनगर** :एकनाथ शिंदेंच्या सर्व मंत्र्यांना आयकर विभागाची नोटीस गेली असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. एकनाथ शिंदेंच्या कुटुंबातील एका सदस्याला देखील ईडीची नोटीस गेलेली असल्याचेही त्यांनी सांगितले. ते आज छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यात सुरू असलेल्या पक्षप्रवेशांवरही संभावना व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज छत्रपती संभाजीनगरमध्ये पक्षाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यानंतर रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना अनेक दावे केले.

महायुतीमध्ये सध्या सर्व काही ऑल इज नॉट वेल सुरू आहे. एकनाथ शिंदेंच्या सर्व मंत्र्यांना इनकम टॅक्सचा नोटीस गेलेल्या आहेत. स्वत: एकनाथ शिंदेंच्या परिवारातील एका व्यक्तीला सुद्धा ईडीची नोटीस गेलेली आहे. कदाचित संजय शिरसाट यांचा व्हिडिओ बघितल्यानंतर एकाकडेच एवढ्या बॅग असतील, तर बाकींच्याकडे सुद्धा असू शकतात, असे आयकर विभागाला वाटले असेल. त्यामुळे त्यांना नोटीस गेल्या असाव्यात, असे रोहित पवार म्हणाले. नोटीस आली नसेल, तर त्यांनी तसे सांगावे आणि आली असेल, तर कशाची आली? हे देखील त्यांनी सांगावे, असे आव्हान रोहित पवार यांनी केले.

कल्याणमध्ये माजी भाजपचा एक आमदार जो आता अपक्ष लढला होता. कारण शिंदेंच्या उमेदवाराला तिथे संधी दिली होती. तो आता एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या बिल्डरविरोधात आंदोलनाला बसलेला आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांनी कारवाईचे आदेश दिले आहेत. पण अद्याप कारवाई झालेली नाही. भाजप प्लॅनिंग करून एकनाथ शिंदेंच्या आमदारांना, मंत्र्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना टार्गेट करत आहेत. त्यांच्याशी निगडीत असलेले व्यवसायांना देखील लक्ष्य केले जात आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

एकनाथ शिंदे कितीवेळ दिल्लीला गेले? मध्ये मध्ये ते साताऱ्याला त्यांच्या गावी जातात, का जातात? तर जेव्हा या तीन पक्षांमध्ये ऑल इज नॉट वेल असते तेव्हा ते जात असतात. सुप्रीम कोर्टात जी सुनावणी लागली, त्यात धनुष्यबाण हे चिन्ह उद्धव ठाकरेंना मिळण्याची शक्यता वाढलेली आहे. त्यांना धनुष्यबाण मिळणार असेल, तर घड्याळ आम्हाला मिळण्याची शक्यता आहे. हे जर झाले, तर धनुष्यबाण आणि घड्याळावर निवडून आलेले जे पक्ष आहेत, त्यांच्या दोन पर्याय राहतात. पहिला म्हणजे सर्व आमदार घेऊन भाजपमध्ये विलीन व्हायचे. दुसरा जेवढे आमदार आहेत, त्या ठिकाणी पुन्हा निवडणूक होईल.

आमदारकीची निवडणूक अजून चार वर्षांनंतर आहे. अशा परिस्थितीत मेघना बोर्डीकर जिथून आमदार आहेत, त्यांच्याच मतदारसंघात विजय बांबर्डे यांना घ्यायचे कारण काय? कदाचित निवडणूक लागली, तर उमेदवार आपल्या हातात असावा, यासाठी सर्व पक्षांनी आपापली तयारी केली आहे. जालन्यामध्ये एकनाथ शिंदे यांचे अर्जुन खोतकर हे आमदार आहेत. त्यांच्याविरोधातील काँग्रेसमध्ये असणारे गोरंट्याल हे भाजपमध्ये गेले आहेत. आत्ताच का गेले? तर कारण कदाचित निवडणूक लागू शकते. या सर्व संभावना आम्ही बोलून दाखवल्या. काहीही होऊ शकते, असे रोहित पवार म्हणाले. एकनाथ शिंदे हे सध्या सहसा माध्यमांसमोर येत नाहीत. अजित पवारही येत नाही. ते जेव्हा येतात, तेव्हा ते आक्रमक बोलून जातात, असेही रोहित पवार म्हणालेत.

## मराठवाड्यात काँग्रेसला बुस्टर डोस : बाबाजानी दुर्राणी यांचा समर्थकांसह काँग्रेसमध्ये प्रवेश

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस (शदरचंद्र पवार) पक्षाचे परभणी जिल्ह्यातील तीन वेळचे आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. बाबाजानी दुर्राणी महाराष्ट्र धर्म वाचवण्याच्या विचारातून काँग्रेसमध्ये आलेत. त्यांच्या प्रवेशामुळे मराठवाड्यात काँग्रेसला अधिक बळ मिळेल, असे सपकाळ यावेळी म्हणाले. बाबाजानी दुर्राणी यांनी काँग्रेस पक्षाचे मुख्यालय असलेल्या टिळक भवन येथे काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बाबाजानी दुर्राणी यांच्यासह परभणीतील माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक, जिल्हा बँकेचे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, संचालक व हजारो कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

भारताचा व काँग्रेसचा डीएनए एकच

यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, देशात दोन विचारधारा आहेत. समतेचा, संविधानाचा सर्वांना सोबत घेऊन जाणारा एक विचार आहे आणि दुसऱ्या बाजूला संविधान व लोकशाही न माननारा हुकूमशाही व 'हम दो हमारे दो', हा विचार आहे. भारताचा व काँग्रेसचा डीएनए एकच आहे. देशात व राज्यात सध्या अराजक पसरलेले आहे, एका उद्योगपतीसाठी देशाला वेठीस धरले जात आहे, तर महाराष्ट्रात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यात धुमश्चक्री सुरु आहे. यातून 'महाराष्ट्र धर्म' वाचवण्याची गरज असून बाबाजानी दुर्राणी यांनी देशाला जोडणारा, महाराष्ट्र धर्म वाचवणारा विचार निवडला आहे. येणारा काळ हा काँग्रेसचा असेल असे सांगून बाबाजानी दुर्राणी यांच्या काँग्रेस प्रवेशाने परभणी जिल्हा व मराठवाड्यात काँग्रेस पक्षाला अधिक बळ मिळेल असा विश्वास सपकाळ यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५


## रोटरी क्लब मुरूम सिटीतर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेरडवाडी ,तालुका उमरगा येथे रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने सामाजिक बांधिलकीतून आरोग्य या संकल्पनेवर आधारित एक प्रेरणादायी उपक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वसंतराव मंडले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब मुरूमचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी आणि सचिव रोटे कल्लप्पा पाटील होते.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व नरवीर उमाजी नाईक यांच्या प्रतिमेची पूजन करून करण्यात आले.रोटरी क्लब मुरूम सिटी आणि ग्रामीण रुग्णालय मुरूम यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासणी आणि आरोग्य तपासणी करण्यात आली यासाठी डॉ. नितीन डागा, डॉ.महेश स्वामी, ग्रामीण रुग्णालय मुरूमचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अर्धाळे , प्रयोगशाळा सहाय्यक लोहार व परिचारिका ममता साबळे तसेच मातोश्री डी एम एल टी कॉलेज मुरूमचे विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. या शिबिरामध्ये 60 विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासण्यात आले व जवळपास 90 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.आरोग्य हीच धनसंपदा आहे. आरोग्य उत्तम ठेवले पाहिजे, यासाठी नियमित व्यायाम आणि योग्य आहार घेतला पाहिजे असे प्रतिपादन प्रमुख अतिथी रोटरी क्लब मुरूमचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले. तर रोटरी क्लब मुरूम सिटीचे सामाजिक बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण असून खरोखरच प्रेरणादायी आहे आणि सर्विस अबोह सेल्फ या ब्रीद वाक्यानुसार समाजासाठी काम करणारी संघटना म्हणून सर्व स्तरातून प्रशंशा मिळवत आहे असे उद्गगार शालेय समितीचे अध्यक्ष मंडले यांनी केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन डागा यांनी केले, तर सूत्रसंचालनाचे सुरेख व प्रासादिक संचलन रोटे. सुनील राठोड यांनी केले. कार्यक्रमाची सांगता रोटरी क्लब मूरूमचे सचिव रोटे कल्लाप्पा पाटील यांनी आभार प्रदर्शनाने केली.या कार्यक्रमासाठी रोटे. कमलाकर मोटे ,रोटे. प्रा.कलय्या स्वामी ,रोटे. मल्लिकार्जुन बदोले, रोटे. भूषण पातळे ,रोटे. शरणप्पा धुमा, कॉर्नर स्टील सेंटरचे प्रमुख धनराज धुम्मा,शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष रणजीतकुमार भोखले, मुख्याध्यापक अनिल मुडमे, सहशिक्षक बालाजी भालेराव, युवराज चव्हाण, रंजना तांदळे, युवा प्रशिक्षणार्थी राधिका जमादार, पत्रकार नामदेव भोसले चंद्राम मंडले व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आज बेघर निर्वासितांचा सर्व पक्षीय जन आक्रोश महामोर्चा




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : आज सर्व पक्षीय आंबेडकरी संघटनाच्या नेतृत्वात पत्रकार परिषद घेण्यात आली.सदर वेळी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की,शहरात जिल्ह्यात सुरु असलेल्या अमानुष बुलडोजर कारवाईत गोर गरीबांच्या आयुष्य उध्वस्त करण्यात येत आहे या विरुद्ध त्यांचे अगोदर पुनर्वसन करुण योग्य मोबदला देण्यात यावा या व अशा असंख्य लोकहीताच्या मागण्या घेवुन उद्या क्रांतीचौक ते विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर. पर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे. सकाळी ११:३० वाजता क्रांतिचौकातुन छत्रपति शिवाजी महाराजांना अभिवादन करुन महामोर्चाला सुरवात होईल पुढे क्रांतीचौक सिल्लेखाना पैठणगेट गुलमंडी सिटीचौक किल्लेअर्क मार्गे व्हिआयपी रोडने विभागीय आयुक्त कार्यालय येथे पोहचुन विभागिय आयुक्त यांना निवेदन सादर करुन या महामोर्चाचे सभेत रुपांतर सभेत होईल. सर्व धर्मिय, सर्व पक्षीय, आंबेडकरवादी, संविधानवादी, समतावादी, मानवतावादी संघटनांच्या व आंबेडकरवादी चळवळीच्या वतीने हा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. अतिक्रमनाच्या नावावर बाधीत होणाऱ्या नागरिकांची कुठल्याही प्रकारचे पुनर्वसन न करता ऐन पावसाळ्यात हजारो शहरवासियांना बेघर व निर्वासित करणाऱ्या व प्रस्थापित श्रीमंताना अभय देणाऱ्या प्रशासनाच्या बुलडोजरताही धोरणाच्या विरोधात तसेच गायरान धारकाच्या गोर-गरीब, दलित, पिडीत वंचित कष्टकरी, बहुजन, कामगार, अल्पसंख्यांक मागासवर्गिय समाजबांधवांच्या न्याय हक्कासाठी जनआक्रोश महामोर्चात हजारोच्या,लाखोंच्या संख्येने गोर-गरीब, दलित, पिडीत वंचित कष्टकरी, बहुजन कामगार, अल्पसंख्यांक समाजबांधव उपस्थितीत राहणार आहेत.मानवतेच्या रक्षणासाठी हा लढा पुकारण्यात आला आहे.प्रत्येक नागरीकाने सामाजिक बांधिलकी समजुन लाखोंच्या संख्येने या जन आक्रोश महामोर्चात सामिल व्हावे असे आवाहन दिपक निकाळजे, अरविंद कांबळे,दिपक केदार, अमित वाहुळ,जयश्री शिरके,विष्णु जगताप, आनंद कस्तुरे, जयेश अभंग, मनोज जाधव, मिलिंद बनसोडे, विजय शिंगारे, वसंतराज वक्ते, बलराज दाभाडे, सिध्दोधन मोरे, नागेश केदारे, विजय बचके, सचिन जोगदंडे संतोष चव्हाण, राजकुमार कांबळे व विविध पक्ष संघटनेचे प्रतिनिधि कार्यकर्ते सामिल होते..

## जगातील प्रत्येक चमत्कार विज्ञानावर आधारित असतो - शहाजी भोसले यांचे प्रतिपादन



**सिल्लोड (प्रतिनिधी)** : अनेक भोंदू बाबा विज्ञानाचाच आधार घेत चमत्काराचे प्रयोग करून भोळ्या भाबड्या समाजाची फसवणूक करतात. अशा भोंदू बाबांच्या कृत्यांचा भांडाफोड करण्याचे काम सातत्याने महा. अंनिस करीत आहे. अशा भोंदू बाबा - बुवापासून सावध रहावे, असे आवाहन महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी केले. येथील इंद्रराज महाविद्यालयात कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.व्यंकटेश लांब होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा प्रधान सचिव साहित्यिक, कवी प्रा. शिवाजी वाठोरे, सुनील चौथमल, प्रकाश दौड, दिलीप शिखरे आदी उपस्थित होते. या वेळी "चमत्काराची दुनिया विज्ञानाची किमया" अंतर्गत काही चमत्काराचे सादरीकरण करण्यात आले. प्रा.शिवाजी वाठोरे या वेळी बोलताना म्हणाले की, समाजात अलीकडच्या काळात सुशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या लोकातही मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धा आहे. तिचे उच्चाटन करण्याचे अवघड काम अंनिस कार्यकर्ते सातत्याने करीत आहेत. अंनिस कोणाच्याही श्रद्धेच्या विरोधात नसून समाजातील चुकीच्या गोष्टींवर प्रहार करणारे प्रामाणिक लोकांचे संघटन आहे. कसल्याही फळाची अपेक्षा न ठेवता कार्यकर्ते राज्यभर प्रामाणिकपणे जोमाने काम करीत आहेत, त्यांना प्रतिसाद दिला पाहिजे, असेही ते म्हणाले. बैठकीचे सूत्रसंचालन शाखा प्रधान सचिव नारायण फाळके यांनी केले. प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी आभार मानले. बैठकीस कार्याध्यक्ष डॉ. प्रकाश बिऱ्हाडे, जगदीश बेदवे , प्रा. डॉ. माधवसिंग इंगळे, मधुकर देहाडे, प्रा. डॉ. सविता म्हस्के यांचेसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

# रक्तदान शिबिराचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** समाजाच्या ऋणातून उतराई होण्याची संधी रक्तदान शिबिराच्या माध्यमातून आपल्या सर्वांना मिळत आहे. त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकीची जाणीव आपल्या पाल्याला करून देण्यासाठी आपण स्वतः आपल्या परिवारातील इतर सदस्य व इष्ट मित्रांना घेऊन या रक्तदान शिबिरास सहकार्य करावे. रक्तदानानंतर उपवासाच्या पदार्थांची व अल्पोपहाराची देखील सोय करण्यात आलेली आहे.रक्तदान केल्यानंतर आपणास प्रमाणपत्र देखील देण्यात येईल.तरी जास्तीत जास्त नागरिकांनी ह्या रक्तदान शिबिरात सहभाग घ्यावा असे आवाहन मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस ह्यांनी केले आहे.

दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. सकाळी ८.३० ते दुपारी १२.०० पर्यंत शाळेच्या सभागृहात हे रक्तदान शिबिर संपन्न होईल.

संपर्कासाठी
**राजेंद्र ब्राह्मणे**
९८२२८१३२५२

# नविन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर व्याख्यान संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम येथे बी ए, बी कॉम व बीएससी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ व नवीन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्राध्यापक डॉक्टर उद्धव भाले, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नळदुर्ग यांनी अतिशय सविस्तर अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून आयक्यूएसी समन्वयक प्राध्यापक डॉक्टर राम बजगिरे होते त्याचबरोबर प्रमुख उपस्थिती मध्ये प्राध्यापक डॉक्टर सतीश शेळके संचालक, नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम तसेच नॅक समन्वयक, मुकुंद धुळेकर त्याचबरोबर प्राध्यापक डॉक्टर सुजित मटकरी व प्राध्यापक डॉक्टर सुशील मठपती एनईपी २०२० समन्वयक यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले .या कार्यक्रमाचे प्रस्तावना प्राध्यापक डॉक्टर सुजित मटकरी यांनी केली तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्राध्यापक डॉक्टर सुशील मठपती यांनी करून दिला .याप्रसंगी बोलताना नवीन शैक्षणिक धोरण ही बदलत्या शैक्षणिक काळाची गरज आहे असे मत प्राध्यापक डॉक्टर भाले यांनी मांडले . विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे अतिशय महत्त्वाचे आहे असे मत अध्यक्षीय समारोप करताना डॉक्टर राम बजगिरे यांनी मांडले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्राध्यापक डॉक्टर मुकुंद धुळेकर यांनी मानले याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# समृद्धी महामार्गावर दोन ट्रकचा अपघात एक जण गंभीर जखमी





**दौलताबाद (जावेद अहमद) :** नादुरुस्त ट्रक ला पाठीमागे जाऊन दुसरा ट्रॅक धडकला ट्रक चा चालक गंभीर जखमी झाला आहेमुंबई नागपूर समृद्धी महामार्गावर अब्दीमंडी जवळ चॅनल क्र ४३९.२ वर दि 07 सकाळी अकरा वाजता हा अपघात झाला ट्रॅक क्र CG ०७ BA ६६७७ चालक धर्मदेव यादव वय 57 राहणार छत्तीसगड भिलाई हा मुंबई येथून रायपूर छत्तीसगड कडे लोखंडी भीम भरून जात असताना चॅनेल क्र ४३९.२ जवळ ट्रॅक चा कमानी पट्टा पिन तुटली व त्या ट्रक चे नियंत्रण सुटले व डाव्या बाजूला त्याच ठिकाणी रस्त्याचा बाजूला उभ्या असलेल्या HR५५ A ०५३०२ हा नादुरुस्त उभा होता त्याचा चालक हा ट्रॅक च्या पाठीमागे दुरुस्ती साठी उभा होता त्याच वेळी हा ट्रक त्या ट्रक च्या पाठीमागे जोरात धडकला उभ्या असलेल्या ट्रक चा चालक गंभीर जखमी झाला त्याला समृद्धी महामार्गाच्या रुग्णवाहिकेत उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे






महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

# स. भु. प्रशालेत "वाचन कट्टा" विद्यार्थ्यांच्या हस्ते उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत विद्यार्थ्यांसाठी वाचन कट्टा सुरू करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन विद्यार्थी संसदेची अध्यक्षा कु. तनिषा सूर्यवंशी, श्रेया खेडकर आणि कैवल्य चिंचोलकर या विद्यार्थ्यांच्या हस्ते झाले. या विद्यार्थ्यांनी ' आम्हाला आता अनेक वर्तमानपत्रे पाहायला आणि वाचायला मिळणार, अनेक गोष्टींची, कवितांची आणि माहिती व ज्ञानाचा खजिना असलेली पुस्तकं वाचायला मिळणार असल्याने आनंद झाला' असल्याचे मत व्यक्त केले. प्रशालेतून निवृत्त होणारे ज्येष्ठ शिक्षक रमेश अंबादासराव जोशी यांनी त्यांच्या मातोश्रींच्या स्मृतीप्रित्यर्थ सुमारे ३१ हजार रुपयांची देणगी दिली आहे. या देणगीतून वाचन कट्ट्यासाठी रॅक, स्टॅन्ड आदी साहित्य खरेदी करून हा वाचन कट्टा सुरू करण्यात आला आहे. रिकाम्या तासिकेत तसेच शाळेच्या वेळेआधी, वेळेनंतरचा रिकामा वेळ विद्यार्थी वाचन कट्टा वर थांबून मराठी, हिंदी, व इंग्रजी भाषांमधील वृत्तपत्रे,विविध मासिके, पुस्तके वाचू शकतील. संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, कोषाध्यक्ष मिलिंद रानडे, सहचिटणीस डॉ रश्मी बोरीकर, शालेय समिती अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदाणी, मासिक पत्रिकेचे संपादक मनोज तुळपुळे, मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांच्या प्रमुख उपस्थितीत, विद्यार्थ्यांच्या हस्ते "वाचन कट्टा" उपक्रमाचे उदघाट्न झाले. पर्यवेक्षक विजय चापाईतकर, संजय परदेशी, ग्रंथपाल प्रमिला मुसळे, विजय पिंपळे, डॉ. विनोद सिनकर, प्रवीण जोशी, नंदकुमार चमचे यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या उद्घाटन कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# पीडित मुलींच्या प्रकरणात दोषी पोलिसांवर कार्यवाही करा - महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निवेदन



**सिल्लोड (प्रतिनिधी) :** पुणे येथे संभाजीनगर जिल्ह्यातील एका पीडितेस सहकार्य केल्याचा राग मनात धरून तेथील मुलींना मारहाण व जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या पोलिस कर्मचारी आणि अधिकाऱ्याची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषींवर कडक कार्यवाही व्हावी, अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उप विभागीय महसूल अधिकाऱ्यांमार्फत पाठविण्यात आले. उप विभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार श्रीमती व्ही. बी. उप्पलवाड यांनी निवेदन स्वीकारले. निवेदनात म्हटले आहे, या प्रकरणात पीडित व्यक्ती असलेल्या मुलींना न्याय मिळवून देण्यासाठी गृहमंत्री म्हणून आपण तत्काळ हस्तक्षेप करावा, जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यास अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यानुसार भारतीय न्याय संहिते अंतर्गत गुन्हे दाखल करावेत. सासरच्या छळाने आश्रयासाठी आलेल्या मूळ पीडित मुलीस संरक्षण आणि सुरक्षिततेची हमी द्यावी. आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास संविधानिक मार्गाने राज्यभर जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आलेला आहे. निवेदनावर जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे, सिल्लोड शाखा कार्याध्यक्ष डॉ. प्रकाश बिऱ्हाडे, प्रधान सचिव नारायण फाळके, जगदीश बेदवे, प्रा. डॉ.अनिरुद्ध मोरे, अशोक जाधव, प्रल्हाद पगारे, सुधाकर गायकवाड, रवी गायकवाड, दशरथ सुरडकर, डी. के. सुरडकर, संतोष बोराडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गावाच्या वाटेची

माझ्या गावाच्या वाटेची
ओढ जुनी काळजात
झाड सावलीचे जरी
आता नाही अंगणात

झाड हरवता देवा
गेली सावली निघून
भर उन्हात पोळलं
उभ्या आयुष्याचं रान

एक वावटळ येता
सारी पाखरं उडाली
पानगळीची जिंदगी
जागोजागी विखुरली

झाड हरवले देवा
माती तिथंच राहीली
नाही दिसली कोणास
तिच्या जिवाची काहिली

आता मोडलं घरटं
सारी पांगली पाखरं
आजू बाजू घुटमळे
तरी ओळखीचं वारं

वारं ओळखीचं तिथं
गुण झाडाचंच गाई
तुटलेल्या फांद्या पुन्हा
वाट पाखरांची पाही

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो.** 9403384889

